इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक २० ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या पैकी एक समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१८३ इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेची नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३ शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८२०१९३२४४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.फ. सैराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री. (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

वाचा :-

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक ११ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशासु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

(२) शाळा दर्जावाढीच्या ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची परवानगी देण्यात येत आहे.

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १९७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम** २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिका-यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिका-यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत [illegible] आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जांची छाननी करुन दिनांक ०५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७,१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थाचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ७७७ | पुणे | पी के. फाऊंडेशन चाकण | कडाची वाडी | मराठी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७७८ | पुणे | साध्वी प्रीती सुधाजी एज्यु. पतिष्ठान थेरगाव ता. मुळशी | मारुंजी मुळशी | इंगजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७७९ | पुणे | विश्वकल्याण एज्युकेशन सोसायटी तळेगाव दाभाडे, मावळ, जि. पुणे पिन. ४१०५०६ | तळेगाव दाभाडे, ता. मावळ | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८० | पुणे | अरिहंत एज्युकेशन फांउडेशन चितळेनगर मार्केटयार्ड | पुलगेट पुणे | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८१ | पुणे | छत्रपती संभाजी शिक्षण संस्था, शिरुर | शिरूर, ता. शिरूर | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८२ | पुणे | श्रीनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, कोंढापुरी, ता शिरूर. | कोंढापूरी ता. शिरुर | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८३ | पुणे | कमला एज्यु.सोसा. चिंचवड | चिंचवड | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८४ | पुणे | डेक्कन एज्युकेश्न सोसा. टिळक रोड. | टिळक रोड | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८५ | पुणे | अरिहंत एज्युकेशन फांउडेशन चितळेनगर मार्केटयार्ड | मुळशी | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८६ | पुणे | भिगवन शिक्षण प्रसारक मंडळ भिगवन. ता. इंदापूर | भिगवन ता. इंदापूर | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८७ | पुणे | भास्कराचार्य प्रतिष्ठाण औरंगाबद | गाउडदरा हवेली | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८८ | पुणे | तुळजा भवानी एज्यु. सोसा. | निमगव केतक | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७८९ | पुणे | जनसमर्थ संस्था जेजुरी ता. पूरंदर | कुंभारकर वाडी ता. पुरंदर | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७९० | पुणे | केजेस एज्युकेशन इन्स्टयुट मुंकूंदनगर | पिसोळी | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७९१ | पुणे | पी.के. फाऊंडेशन चाकण | कडाची वाडी खेड | इंग्रजी | नविन | पात्र | उच्च माधामिक |
| ७९२ | पुणे | पंडीत रमाबाई मुक्ती मिशन केडगाव ता.दौंड (अल्पसंख्यांक) | मनोरमा मेमो. गर्ल्स हाय. केडगाव | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माधामिक |
| ७९३ | पुणे | सद्‌गुरु शिक्षण प्रसारक मंडळ, लोणी भापकर, बारामती | न्यु.इं. स्कूल लोणी भापकर बारामती | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माधामिक |
| ७९४ | पुणे | भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पारवडी, बारामती | कै. जिजाबाई दादासो गावडे विद्या, पारवडी | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माधामिक |
| ७९५ | पुणे | कृषि उद्योग मुल शिक्षण संस्था, का-हाटी, बारामती | का-हाटी, ता. बारामती | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माधामिक |

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | उच्चस्तरीय समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ८१० | पुणे | भैरवनाथ शिक्षण मंडळ, खुटबाव, दौंड | श्री रोकडोबा मा.व उ.मा.विद्या. भांडगाव | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८११ | पुणे | खंडेश्वर शिक्षण संस्था खामगाव दौंड | न्यू. इं. स्कूल खामगाव, ता.दौंड | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१२ | पुणे | सर्वोदय शिक्षण संस्था, रावणगाव, दौंड | सरस्वती मा. व उच्च. माध्य. विद्य. रावणगाव | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१३ | पुणे | विठ्ठल विद्या प्रसारक मंडळ, भिकोबानगर, ता. बारामती | श्री विठ्ठल मा. वि. फरांदे | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१४ | पुणे | आदर्श बालमंदिर शिक्षण संस्था, भोसरी | कै. स.ना.वारसे मा. व. उ. मा. विद्या भोसरी पुणे | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१५ | पुणे | मेनका सोपानराव मोझे चॅरिटेबल ट्रस्ट, येरवडा | धानोरी पुणे शहर | मराठी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१६ | पुणे | औद्योगिक संघ शिक्षण संस्था पुणे. | सिटी प्राईड हायस्कूल एमआयडीसी चिंचवड | इंग्रजी | दर्जावाढ उच्चमाध्यमिक | पात्र | उच्च माध्यमिक |
| ८१७ | पुणे | कृषिलोक विकास संशोधन संस्था शिरूर | कुकडी वसाहत,शिरूर | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८१८ | पुणे | श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्था शिरूर | ढोकसांगवी शिरूर | इंग्रजी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८१९ | पुणे | अभिजात एज्यु. सोसा | अभिजात माध्य. विद्या. कर्वेनगर | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२० | पुणे | उत्कर्ष शिक्षण कला व क्रिडा मंडळ, वडगाव बु. | उत्कर्ष माध्य. विद्या. आंबेगाव बु. | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२१ | पुणे | शंभो ग्रामविकास मंडळ, बारामती | विनय बालविकास मंदीर, वाघळवाडी, बारामती | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२२ | पुणे | शहीद जवान स्मृति विद्याप्रतिष्ठान दौंड | दौंड पब्लीक स्कूल दौंड | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२३ | पुणे | सोमनाथ शै. संस्था, वडगाव शेरी | वडगाव शेरी | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२४ | पुणे | अमर एज्यु. सोसा. धनकवडी | ज्ञानप्रसारक विद्यामंदीर धनकवडी | मराठी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२५ | पुणे | पुणे कटक मंडळ पुणे | जुना मोदीखाना पुणे | इंग्रजी | दर्जावाढ माध्यमिक | पात्र | माध्यमिक |
| ८२६ | अहमदनगर | स्व..एकनाथ पाचपुते विचारधारा ट्रस्ट श्रीगोंदा ता.श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर | परिक्रमा पब्लिक स्कूल काष्टी ता.श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर | इंग्रजी (सीबीएसई) | नवीन शाळा | पात्र | पूर्व प्राथमिक |